ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था

*प्रा. डॉ. सौ.अरुणा रविंद्र वाघोले,

* सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग प्रमुख, मा. बाळासाहेब जाधव क, वा, वि.महाविदयालय , आळे, ता.जुन्नर. जि .पुणे. ४२२४११.

सारांश:

२१ व्या शतकातील जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात विकसित झालेली दिसते. उदारीकरण, खासगीकरण आणि बाजार व्यवस्था स्वीकारणे हे सर्व सहभागी राष्ट्रांच्या हिताचे आहे. प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांच्या देशात हे करण्यात आले. यात गॅट करार, डंकेल प्रस्ताव, जागतिक बाजार संघटना यांचे स्थान महत्त्वाचे कार्य करेल.

मुक्त बाजार वैशिष्टये, पंचवार्षिक योजनेतील उद्दीष्टे यातून भावी काळातील उदारीकरण, मुक्त बाजार यातील भूमिका व कार्य, जागतिक साधनसामग्रीचा चोख पद्धतीने वापर करणे, जागतिकीकरणात लोकांचे राहणीमान वाढवणे, रोजगार, व्यवसाय, महसूल वाढविणे, वित्तीय आर्थिक धोरणातून व्यापार वाढ, रोजगार निर्मिती, स्वायत्तता, आंतरराष्ट्रीय व्यापारास गती मिळाली. 1) विचार विनिमय वाढला. 2) व्यापारातील भेदभाव नष्ट झाला. 3) आंतरराष्ट्रीय बाजारात वाढ होण्यास, व्यापारात वाढ होण्यास मदत झाली. 4) आयात व निर्यातीस चालना मिळाली. 5) डंकेल प्रस्तावातील तरतुदींचा स्वीकार करण्यात आला. शेती, व्यापार, पेटंट, सेवाक्षेत्र, सुती कापड, संगोपन, तंत्रज्ञान विकासाला चालना मिळाली.

अशाप्रकारे विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांच्याद्वारे जागतिकीकरण व मुक्त बाजार धोरण राबविण्यात यशस्वी झाले. यातून आपापसात, राष्ट्राराष्ट्रांत आपलेपणा, जिव्हाळा, विकास, रोजगार व बाजार मतभेद दूर होण्यास मदत झाली.

Copyright © 2025 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

प्रास्ताविक:

जागतिकीकरण म्हटले की, त्यात जगातील सर्व राष्ट्रांनी सहभागी व्हावे. उदारीकरण, खासगीकरण आणि बाजार व्यवस्था स्वीकारणे हे त्यांच्याच हिताचे आहे हे पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न होतो. हा प्रयत्न बडया राष्ट्रांनी विकसनशील देशांत केला.

"जागतिकीकरण म्हटले की त्यात गॅट करार, डंकेल प्रस्ताव, जागतिक व्यापार संघटना आपल्या डोळ्यासमोर येते"[१]

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

मुक्त व्यापार :

मुक्त व्यापार किंवा खुला व्यापार धोरण हे भांडवलशाही व्यवस्थेचे प्रतीक आहे. युरोपात भांडवलशाहीचा विकास घडवून आल्यानंतर मुक्त व्यापार धोरणाचा मोठया प्रमाणावर अवलंब केला जाऊ लागला. ब्रिटिशांनी भारताच्या संदर्भात देखील या धोरणाचा अवलंब केला.

ॲडम स्मिथ यांना खुल्या व्यापार धोरणाचा जनक किंवा प्रणेता म्हणून संबोधले जाते. ॲडम स्मिथ यांनी "शासन संस्थेने निर्हस्तक्षेपाचे धोरण स्वीकारावे व खुल्या व्यापाराचा अवलंब करावा असे विचार मांडताना खुल्या किंवा मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन केलेले आढळते."

१) ज्या आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक धोरणात देशी व विदेशी वस्तूंमध्ये कोणताही भेदभाव केला जात नाही.

२) विदेशी वस्तूंच्या आयातीवर कोणतीही बंधने किंवा निर्बंध लादले जात नाही.

३) त्याचप्रमाणे देशात उत्पादित होणाऱ्या वस्तू व सेवांच्या निर्यातीच्या बाबतीत कोणतीही विशेष सवलत दिली जात नाही.

शासन व्यवस्थेला महसूल उत्पन्न मिळवून देणे हा उद्देश असतो.

मुक्त व्यापाराची वैशिष्टये :

१) नैसर्गिक व्यापार.

२) निर्बंध नसतात.

३) लाभांचे स्वीकारण.

४) भेदभावरहित धोरण.

५) निवडीचे स्वातंत्र्य.

६) स्पर्धा दृष्टीकोनात वाढ.

७) सरकारकडून मदत नाही

८) भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने नियोजन आयोगाची स्थापना १९ जानेवारी १९५० रोजी केली. या आयोगाच्या कार्याला २० मार्च १९५० रोजी सुरुवात झाली. पंतप्रधान हा या आयोगाचा पदसिद्ध असतो. जागतिकीकरणातील भारताची प्रतिमा काय असेल हे पहावयाचे झाल्यास गॅट करार, डंकेल प्रस्ताव आणि जागतिक व्यापार संघटनेचे उद्दिष्ट लक्षात घेऊन नंतरच जागतिकीकरणातील भारताच्या प्रतिमेचा अंदाज करता येईल."[२] तसेच ६ एप्रिल १९४८ रोजी भारताच्या राष्ट्राच्या औद्योगिक नीतीबाबत संसदेत ठराव मंजूर करण्यात आला.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

पंचवार्षिक योजनेतील काही उद्दिष्टे :

एकूण नऊ उद्दिष्टे होती, त्यापैकी काही महत्त्वाची

१) राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न जलद गतीने वाढविणे.

२) कृषी क्षेत्रातील व औद्योगिक क्षेत्रातील विकासाचा समतोल विकास घडवून आणणे.

३) नैसर्गिक साधनांचा व उत्पादन घटकांचा उपयोग करून रोजगारात वाढ करणे.

४) लोकांचे जीवनमान वाढविण्यासाठी लोकांचे दारिद्र्य कमी करणे.

५) आर्थिक विकासासाठी औद्योगिक विकास जलद गतीने घडवून आणणे.

६) आयात कमी निर्यातीला उत्तेजन देणे.

७) देशात सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करून मागासलेल्या लोकांची प्रगती करणे.

८) भारतात स्थैर्य व समृद्धी मिळवून देणे व भारताच्या सर्वांगीण विकास घडवून आणणे.[४]

१९८० साली इंदिरा गांधी पुन्हा सत्तेवर आल्यानंतर त्यांनी उदारीकरणाचे धोरण, औद्योगिक परवाना पद्धतीचे नियंत्रण आणि मक्तेदारी संस्थांवरील निर्बंध कमी करून राबविण्याचे प्रयत्न केले. हे दुसरे-तिसरे काही नसून मुक्त अर्थव्यवस्थेची ती सुरुवात होती. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांच्या तुलनेने हे उपाय जरी किरकोळ वाटले तरी टीकाकारांनीसुद्धा त्यास 'नवा मार्ग' असे म्हटले आहे. १९८४ साली जेव्हा राजीव गांधी सत्तेवर आले तेव्हा त्यांनी औद्योगिक निर्बंधीकरण, विनिमय दर, लवचीकता आणि आयात निर्बंध शिथिल करून सुधारणांचा वेग वाढविण्यास सुरुवात केली. राजीव गांधींनी आर्थिक सुधारणेचे जे प्रयत्न केले तेही बोफोर्स प्रकरणातून उद्भवलेल्या राजकीय वादळामुळे आणि व्ही.पी. सिंगसह अनेकांनी त्यांची साथ सोडल्यामुळे सोडून देण्यात आले.

आर्थिक सुधारणांची गरज जरी बऱ्याच आधी मान्य झाली होती तरी अनेक कारणामुळे त्या व्यापक व एकत्रितपणे राबविणे शक्य झाले नाही, सरकार जेव्हा दुर्बल स्थितीत असते (बोफोर्स घोटाळयात सापडलेले राजीव गांधी, पंजाब प्रश्नात अडकलेल्या इंदिरा गांधी आणि बाबरी मशीद पाडली गेल्यामुळे नरसिंह रावांची झालेली अडचण) तेव्हा वित्तीय शिस्त, श्रम कायद्यात बदल यांसारखी सुरुवातीला क्लेशदायक वाटणारी अप्रिय घोरणे अमलात आणणे त्रासदायक असते,

१९९१ साली जेव्हा देशाची आर्थिक पत धोक्यात येण्याचे संकट उभे राहिले तेव्हा सुधारणांना होणाग्र सैद्धान्तिक व हितसंबंधी विरोध अगदी क्षीण झाला होता. त्याचा फायदा नरसिंह राव सरकारला घेता आला आणि परंपरावादी दृष्टिकोन मोडून त्यांनी अभूतपूर्व अशा सर्वसमावेशक आर्थिक सुधारणांना सुरुवात केली. अर्थात, या आर्थिक सुधारणांना तसा उशीरच झाला होता,

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

तरीही चीनने नवे आर्थिक धोरण स्वीकारल्यापासून सुमारे तेरा वर्षांनी का होईना भारताने १९९१ साली आर्थिक सुधारणांना सुरुवात केली.

१९९१ साली सुरू झालेल्या आर्थिक सुधारणा प्रक्रियेत इतर गोष्टींबरोबर ताबडतोब वित्तीय क्षेत्रात सुधारणा, विनिमय दर बाजारदराजवळ वास्तवपूर्ण रीतीने ठेवणे (सुरुवातीलाच रुपयाचे २० टक्के अवमूल्यन झाले), व्यापार व औद्योगिक उदारीकरण, मुक्त आयात, मक्तेदारी कायदा मोडीत काढणे आणि परवाना पद्धती काढून टाकणे, टप्प्याटप्प्याने खासगीकरणासह सरकारी क्षेत्राची सुधारणा, वित्तीय क्षेत्र व भांडवल बाजारात सुधारणा, परकीय भांडवल व बहुराष्ट्रीय कंपन्यांवरील बहुतांश नियंत्रणे उठवणे व प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीचे स्वागत इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश होता. थोडक्यात, अर्थव्यवस्थेला गुदमरून टाकणाऱ्या बंधनांपासून मुक्त करणे आणि तिला हितकारक ठरेल अशा रीतीने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे यासाठीचा हा प्रयत्न होता.

अनेक समस्या आणि आव्हाने जरी कायम असली तरी सुरुवातीच्या काळात या सुधारणा सर्वच दृष्टीने प्रशंसनीय होत्या. अतिशय गंभीर अशा स्थूल अर्थशास्त्रीय अरिष्टातून भारताने अतिशय वेगाने सुटका करून घेतली.

जागतिकीकरण सर्व राष्ट्रांनी मान्य करावे व त्यात सहभागी व्हावे या उद्देशाने जागतिकीकरणाच्या जमेच्या बाजूंचा प्रचार बड्या भांडवलवादी राष्ट्रांनी केला. उदारीकरण, खासगीकरण आणि बाजार व्यवस्था स्वीकारणे हे त्यांच्याच हिताचे आहे हे सर्व पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न बड्या राष्ट्रांनी विकसनशील देशांत केला. भारताने देखील जागतिकीकरण हे वास्तव व अनिवार्य आहे हे ओळखून १५ डिसेंबर, १९९३ रोजी डकेल प्रस्तावावर सही केली. भारताने जागतिकीकरणात भाग घेताना मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला त्यामुळे अशा अर्थव्यवस्थेमुळे भारत खाचखळगे पार करीत जागतिकीकरणात आपली प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे.

जागतिकीकरण म्हटले की, त्यात गॅट करार, डंकेल प्रस्ताव आणि नंतर जागतिक व्यापार संघटना आपल्या डोळ्यांसमोर येते. या सर्वांना एकत्रितपणे जागतिकीकरण किंवा जागतिकीकरणाची प्रक्रिया असे संबोधले जाते. या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून भारताची सुटका होणे शक्य नव्हते. त्यामुळे योग्य वेळ येताच भारतही जागतिकीकरणाच्या मागे नाही. त्यासाठी प्रसंगी भारताला खाचखळग्यांचा अनुभव घ्यावा लागतो.

व्यापार आणि जकातीसंबंधीचा सर्वसाधारण करार (General Agreement on Trade and Tariff) (GATT):

पहिल्या महायुद्धात प्रचंड प्रमाणावर मानवहानी व वित्तहानी घडून आली. या महायुद्धातून जग सावरते न सावरते तोच १९२९ साली प्रथम मंदी अमेरिकेत निर्माण झाली, त्यातून जागतिक महामंदी निर्माण झाली. या मंदीपासून घडा घेऊन मुक्त व्यापाराचे महत्त्व कमी होऊन संरक्षित व्यापाराच्या धोरणास सुरुवात झाली. परंतु पुढे त्याचा प्रतिकूल परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

होऊ लागला, आंतरराष्ट्रीय व्यापारात भाग घेणाऱ्या देशांमध्ये अधिक सामंजस्य निर्माण व्हावे यासाठी व्यापारात सहकार्य वाढावे यासाठी कृत्रिम स्वरुपाची नियंत्रणे कमी करण्याचे जे प्रयत्न झाले त्यातूनच 'व्यापार आणि जकातीसंबंधीचा सर्वसाधारण करार' (GATT) अस्तित्वात आला.

१९४७ साली जिनेव्हा येथे झालेल्या बैठकीत आतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करावी असा निर्णय घेण्यात आला. सानुसार आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी म्हणून व्यापारात भाग घेतलेल्या देशांना आयात-निर्यातीवरील निबंध मी करावेत असा सामूहिक निर्णय घेण्यात आला. जिनेव्हा येथील बैठकीत जे नियम तयार करण्यात आले त्यांचा समावेश गॅट करारात करण्यात आलेला आहे. गॅटचे मुख्य कार्यालय जिनेव्हा येथे आहे. गॅटची स्थापना झाली त्या त्याचे २३ सभासद होते. १९९५ पर्यंत ही सदस्य सख्या ८१ पर्यंत वाढली. १९९५ साली गॅटचे अस्तित्व सात येऊन त्याची जागा 'जागतिक व्यापार संघटनेने (WTO) घेतली आहे. गॅटचे कामकाज तीन तत्त्वांवर आधारित आहे. (१) आंतरराष्ट्रीय व्यापार भेदभावरहित चालावा, (२) व्यापारावरील संख्यात्मक निबंध (नियंत्रणे) सहावीत. (३) व्यापारामुळे निर्माण होणारे मतभेद विचारविनिमय करून मिटवावेत

गॅटची उद्दिष्टे:

१) मुक्त व्यापारास चालना देऊन व्यापारातील मतभेद दूर करावेत.

२) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार करणे,

३) करारात सामील झालेल्या देशांतील रोजगार वाढून जागतिक उत्पादन वाढेल या गोष्टीकडे लक्ष देणे,

४) जागतिक साधनसामग्रीचा योग्य पद्धतीने वापर करणे,

५) जगातील लोकांचे राहणीमान वाढेल यासाठी प्रयत्न करणे.

६) गॅट करारात सहभागी झालेल्या सदस्य देशांनी आंतरराष्ट्रीय व्यापार वाढावा यासाठी व्यापारावरील नियंत्रणे कमी करण्याचे आणि व्यापारातील भेदभाव नष्ट करण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होण्यास मदत झाली आहे.

७) आंतरराष्ट्रीय व्यापार व जकातीवर सुलभ मार्ग काढता यावा व व्यापारास अधिक प्रोत्साहन मिळावे यासाठी गॅटच्या एकूण आठ परिषदा घेण्यात आल्या. प्रत्येक परिषदेत वैशिष्टचपूर्ण बदल करण्यात आले व जागतिक व्यापार अधिक सुलभ व्हावा यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

८) **डंकेल प्रस्ताव (Dunkel Proposal)**

गॅटचे डायरेक्टर जनरल आणि व्यापार वाटाघाटी समितीचे चेअरमन ऑर्थर डंकेल यांनी जकाती आणि व्यापारासंबंधी एक प्रस्ताव लेखी स्वरूपात १९९१ साली सादर केला तोच 'डंकेल प्रस्ताव' या नावाने ओळखला जातो. डंकेल प्रस्ताव

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

हा तांत्रिक आणि कायदेशीर प्रस्ताव असून यात विविध बाबींवर एकूण सात करार करण्यात आले. त्यात (१) बाजारव्यवस्था, (२) शेती, (३) सुती कापड, (४) गॅटचे नियम, (५) व्यापारासंबंधी बौद्धिक संपदा हक्क, (६) सेवांचा व्यापार, (७) संस्थात्मक बाबी यांचा समावेश आहे.

वरील विषयांवर सभासद देशांमध्ये चार वर्षे वाटाघाटी करण्यात आल्या; परंतु अनेक बाबतीत सर्व सदस्यांमध्ये एकमत होऊ शकले नाही. विशेषतः शेतीक्षेत्र, सुती कापड, बौद्धिक संपदा आणि अवमूल्यनाविरुद्ध उपाययोजना यांसारख्या बाबतीत सदस्य राष्ट्रांत मतभेद होते. यातून मार्ग काढण्यासाठी ऑर्थर डकेल यांनी एक प्रस्ताव तयार केला की, जो सर्व सभासद राष्ट्रांनी जसाच्या तसा स्वीकारण्याचे मान्य केले. १५ डिसेंबर, १९९३ रोजी या प्रस्तावाचे कायद्यात रूपांतर करण्यात आले. भारताने मोरोक्को येथे १५ एप्रिल, १९९५ रोजी करारावर सही केली. भारताबरोबर विविध ११७ देशांच्या सभासदांनी करारावर सह्या केल्या आहेत.

डंकेल प्रस्तावातील प्रमुख तरतुदी (वैशिष्ट्ये)-

१) व्यापारात शेतीचा समावेश : प्रस्तावात शेतीच्या बाबतीत प्रमुख तीन तरतुदी करण्यात आल्या आहेत.

(अ) शेतमालाचा व्यापार : या पूर्वीच्या गॅट करारात शेतीमालाचा व्यापारात समावेश करण्यात आलेला नव्हता काल प्रस्तावानुसार शेतमालाचा आंतरराष्ट्रीय व्यापार करताना त्यामधील जकाती कमी करून त्या कालांतराने रद्द करण्यात याव्यात.

(ब) शेतीविषयक धोरण : शेतीसंबंधीच्या धोरणाच्या बाबतीत करारात असे स्पष्ट करण्यात आले की, शैली उत्पावनासाठी दिली जाणारी आर्थिक मदत (अनुदान) १९९३ ते १९९९ या कालावधीत २०% नी कमी करण्यात याचे, परंतु शेतमालाच्या निर्यातीसाठी दिले जाणारे अनुदान बंद करण्यात यावे असा प्रस्ताव डंकेल यांनी मांडला आहे. या प्रस्तावात विकसनशील देशांना सवलती देण्यात आल्या आहेत.

(क) शेती उत्पादनासंबंधी पेटंटचा कायदा: शेती उत्पादनासाठी प्रथमच वापरली जाणारी बियाणे व रोपे यांच्या बाबतीत पेटंटचा कायदा लागू करण्यात आला आहे. यापुढे शेतीक्षेत्रातील कोणत्याही संशोधनास पेटंट कायद्याचे संरक्षण दिले जाईल, डकेलने दिलेला हा प्रस्ताव औद्योगिक क्षेत्रासाठीदेखील लागू केल्याचे प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.

२) व्यापारात सेवाक्षेत्रांचा समावेश : डंकेल प्रस्तावात सेवाक्षेत्रांचा समावेश व्यापारात करण्यात आलेला आहे. सेवाक्षेत्रांत बँका, व्यवसाय सेवा, दळणवळण व वाहतूक, परकीय गुंतवणूक, विमा व्यवसाय, वृत्तपत्रे व तांत्रिक माहिती इत्यादींचा समावेश करण्यात आलेला आहे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

३) **सुती कापड :** भारताच्या दृष्टीने सुती कापड व्यवसाय हिरव्या पेटीत समाविष्ट करण्यात आला आहे. नवीन करारामुळे भारताच्या सुती कापडाच्या निर्यातीत वाढ होण्यास मदत होईल. १९९०-९१ ते १९९२-९३ या कालावधीत भारताची सुती कापडाची निर्यात ९५५८ कोटी रुपयांवरून १८,६४३ कोटी रुपयांपर्यंत म्हणजे दुपटीने वाढली आहे. या उद्योगाचे आधुनिकीकरण केल्यास जागतिक बाजारपेठेत भारताच्या कापड व्यापारास अधिक संधी मिळू शकेल. परंतु चीन, मलेशिया, तैवान व पाकिस्तान या देशांशी भारताला स्पर्धा करावी लागेल.

४) **बौद्धिक संपदा हक्क :** आधुनिक अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्रांतील संशोधनास व तंत्रज्ञान विकासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संशोधनामुळे उत्पादनाचा दर्जा उंचावतो व कमी वेळेत अधिक उत्पादन होते, म्हणून ज्याने नवीन संशोधन केले आहे त्यास संशोधनाचा हक्क प्राप्त होणे आवश्यक असते. ज्या संशोधकाने उत्पादनविषयक नवीन संशोधन केले आहे त्यास त्याचा वापर करण्याचा अधिकार जेव्हा प्राप्त होतो तेव्हा त्यास उत्पादनाचे पेटंट महटले जाते. एखाद्या संशोधकाने केलेल्या संशोधनाचा इतरांनी गैरवापर करू नये यासाठी प्रत्येक देशात कायदा करण्यात आलेला असतो. प्रगत देशांनी उत्पादनात नवनवीन संशोधन करून उत्पादनखर्च कमीत कमी करून जागतिक बाजारपेठेत महत्त्वाचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या बाबतीत अल्पविकसित व विकसनशील देश बरेच मागासलेले दिसून येतात, डंकेल प्रस्तावाचा मुख्य हेतू विविध देशांकडून आंतरराष्ट्रीय व्यापारावर घातली जाणारी नियंत्रणे (निबंध) कमी कान किंवा ती पूर्णपणे काढून टाकणे आणि व्यापारात मुक्त (उदार) धोरणाचा स्वीकार करून आंतरराष्ट्रीय व्यापारात बाढ़ घडवून आणणे हा आहे. कारण आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाल्यास त्याचा फायदा व्यापारात भाग घेतलेल्या सर्वच राष्ट्रांना होत असतो असे डंकेल प्रस्तावात स्पष्ट करण्यात आले आहे.[५]

जागतिक व्यापार संघटना (World Trade Organisation - WTO):

१ जानेवारी, १९९५ रोजी जागतिक व्यापार संघटनेची स्थापना झाल्यामुळे गॅटचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. जागतिक व्यापार संघटना हे नोटचे विस्तारित रूप मानले जाते. भारत गॅटचा संस्थापक सदस्य असल्याने तो व्यापार संघटनेचादेखील सदस्य बनला आहे. जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य कार्यालय स्वित्झर्लंडमधील येथे आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे जागतिक अर्थव्यवस्था अधिक मजबूत होऊन संपूर्ण रोजगार, उत्पादन आणि व्यापारामध्ये वाढ होण्यास मदत होईल, तसेच गॅटपेक्षा जागतिक व्यापार व्याप्ती मोठी असून सभासद संख्यादेखील अधिक आहे. गॅट करारामध्ये व्यापारात फक्त वस्तूचाच होता, पण जागतिक व्यापार संघटनेमध्ये व्यापारात वस्तूबरोबरच सेवांचादेखील समावेश करण्यात आला या संघटनेची सभासद संख्या १९९५ साली ७७ होती ती १९९६ साली १२७ पर्यंत वाढली होती. सध्या या संघटनेचे १४८ देश सभासद आहेत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे :

१) आंतरराष्ट्रीय व्यापारावरील जकाती व इतर निर्बंध कमी करणे.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारातील संबंधामधील भेदभावाचे धोरण नष्ट करणे.

३) सभासद देशांतील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी रोजगार पातळीत वाढ करणे.

४) विकसनशील देशाच्या आर्थिक विकासासाठी हातभार लावून त्यांच्या व्यापारात वाढ घडवून आणणे.

५) जागतिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करून आर्थिक विकास साध्य करणे.

६) व्यापार पद्धती अधिक फायदेशीर आणि टिकाऊ बनविण्यासाठी प्रयत्न करणे.[६]

निष्कर्ष:

२१ व्या शतकातील जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात विकसित झालेली दिसते. उदारीकरण, खासगीकरण आणि बाजार व्यवस्था स्वीकारणे हे सर्व सहभागी राष्ट्रांच्या हिताचे आहे. प्रामुख्याने विकसनशील राष्ट्रांच्या देशात हे करण्यात आले. यात गॅट करार, डंकेल प्रस्ताव, जागतिक बाजार संघटना यांचे स्थान महत्त्वाचे कार्य करेल.

मुक्त बाजार वैशिष्टये, पंचवार्षिक योजनेतील उद्दीष्टे यातून भावी काळातील उदारीकरण, मुक्त बाजार यातील भूमिका व कार्य, जागतिक साधनसामग्रीचा चोख पद्धतीने वापर करणे, जागतिकीकरणात लोकांचे राहणीमान वाढवणे, रोजगार, व्यवसाय, महसूल वाढविणे, वित्तीय आर्थिक धोरणातून व्यापार वाढ, रोजगार निर्मिती, स्वायत्तता, आंतरराष्ट्रीय व्यापारास गती मिळाली. 1) विचार विनिमय वाढला. 2) व्यापारातील भेदभाव नष्ट झाला. 3) आंतरराष्ट्रीय बाजारात वाढ होण्यास, व्यापारात वाढ होण्यास मदत झाली. 4) आयात व निर्यातीस चालना मिळाली. 5) डंकेल प्रस्तावातील तरतुदींचा स्वीकार करण्यात आला. शेती, व्यापार, पेटंट, सेवाक्षेत्र, सुती कापड, संगोपन, तंत्रज्ञान विकासाला चालना मिळाली.

अशाप्रकारे विकसित राष्ट्रांनी विकसनशील राष्ट्रांच्याद्वारे जागतिकीकरण व मुक्त बाजार धोरण राबविण्यात यशस्वी झाले. यातून आपापसात, राष्ट्राराष्ट्रांत आपलेपणा, जिव्हाळा, विकास, रोजगार व बाजार मतभेद दूर होण्यास मदत झाली.

संदर्भ ग्रंथ व तळटीपा :

१) आधुनिक भारत : ले. डॉ. एन. एस. तांबोळी, निराली प्रकाशन, पुणे. जून २००९ प्रथमावृत्ती पृ, क्र. ८.१८

२) आधुनिक भारत स्वातंत्र्योत्तर काळातील आर्थिक धोरण : कित्ता पृ. ८.२

३) आधुनिक भारत : कित्ता पृ. क्र. ८.२

४) आधुनिक भारत (१७५० ते १९८४) : ले. डॉ. एन. एस. तांबोळी, प्रा. व्ही. पी. पवार.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XII, Special Issues–I (B) Nov – Dec 2025

Original Research Article

५) प्रकाशक- निराली प्रकाशन प्रथमावृत्ती २००५ पृ.क्र. १५.१५

६) आधुनिक भारत : ले. डॉ. एन. एस. तांबोळी : कित्ता पृ. क्र. ८.२०

७) आधुनिक भारत : कित्ता पृ. क्र. ८.२७

Cite This Article:

***प्रा. डॉ. सौ. वाघोले अ. र.* (2025).** *जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था.* **In Educreator Research Journal: Vol. XII (Issue VI),** pp. 174–182. **Doi:** https://doi.org/10.5281/zenodo.18397950